मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » शनिवार, दि. 08 ऑगस्ट 2026 | पान- 1

# महापालिका कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर प्रशासन सकारात्मक

## नगरसेवक तथा 'क' प्रभाग सभापती निखिल बोऱ्हाडे यांची आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे मागणी



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघाने दिलेल्या संप नोटिशीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष शशिकांत (बबनराव) झिंजुर्डे, संघटनेचे पदाधिकारी आणि विभागप्रमुख उपस्थित होते.

बैठकीत सर्व पात्र अधिकारी-कर्मचाऱ्यांना रु. २५ हजार सानुग्रह अनुदान आणि ८.३३ टक्के बोनस पुढील पाच वर्षांसाठी देण्याबाबतचा करार आठ दिवसांत पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. सेवा प्रवेश नियमावली अंतिम करून एका महिन्यात शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे, जुनी पेन्शन योजनेबाबत समिती स्थापन करणे तसेच आरोग्य विभागातील २५ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या पात्र कर्मचाऱ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत मोफत घरे उपलब्ध करून देण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेण्यात आली.

याशिवाय कर्मचारी महासंघाने मांडलेल्या इतर २८ मागण्यांवरही लवकर कार्यवाही करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले. बैठकीतील निर्णयांचे अधिकृत सभावृत्त मिळाल्यानंतर महासंघ सर्व कर्मचाऱ्यांशी चर्चा करून ३१ जुलै रोजी दिलेल्या संप नोटिशीबाबत पुढील भूमिका जाहीर करणार असल्याचे सांगण्यात आले.

# 'मिसिंग लिंक'च्या बोगद्यात भीषण अपघात; वाकडमधील व्यावसायिकाचा मृत्यू; सहाजण जखमी

## कारमधील चार मित्रांसह टेम्पोचालक अन् मदतनीस जखमी; एकाची प्रकृती अत्यंत चिंताजनक



### अपघाताची ठळक माहिती

» **मुंबई-पुणे मिसिंग लिंकच्या बोगद्यात शुक्रवारी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात वाकड येथील बांधकाम व्यावसायिक तुषार वामन भूमकर (वय ३५) यांचा जागीच मृत्यू झाला. भरधाव कारने समोरील टेम्पोला मागून जोरदार धडक दिल्याने कारचा चुराडा झाला, तर टेम्पो उलटला. या अपघातात कारमधील चार आणि टेम्पोतील दोन अशा सहा जणांना दुखापत झाली असून, त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक आहे. लोणावळा शहर पोलिसांनी तत्काळ मदतकार्य करून जखमींना रुग्णालयात दाखल केले असून, अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुंबई-पुणे मिसिंग लिंकच्या बोगद्यात पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या भरधाव मोटारीची टेम्पोला धडक बसून झालेल्या अपघातात वाकड येथील एका बांधकाम व्यावसायिकाचा जागीच मृत्यू झाला. सहाजण जखमी झाले आहेत. जखमींपैकी एकाची प्रकृती चिंताजनक आहे. हा अपघात शुक्रवारी मध्यरात्री सव्वाएकच्या सुमारास झाला.

तुषार वामन भूमकर (वय-३५, रा. वाकड) असे अपघातात मृत्यू झालेल्या बांधकाम व्यावसायिकाचे नाव आहे. जखमींमध्ये मोटारीमधील प्रसाद विनोदे, पंकज पाटील, प्रदीप भुसारे, अमित भाटी (सर्व रा. वाकड, पिंपरी चिंचवड), टेम्पोचालक रामभाऊ मुंडबे (रा. धाराशिव), मदतनीस कुलदीप पवार (वय ३१, रा. औसा, लातूर) यांचा समावेश आहे. याबाबत पवार यांनी लोणावळा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भूमकर हे काही कामानिमित्त मित्रांबरोबर मिसिंग लिंकवरून मुंबईकडे जात होते. शुक्रवारी मध्यरात्री सव्वाएक वाजण्याच्या सुमारास मिसिंग लिंकच्या बोगद्यातून भरधाव वेगात जाणाऱ्या मोटारीवरील चालक अमितचे नियंत्रण सुटले. मोटार समोरील टेम्पोला मागून जोरात धडकली. ही धडक इतकी भीषण होती की, मोटारीचा चुराडा झाला आणि टेम्पो मार्गावर उलटला. या भीषण धडकेत तुषार भूमकर यांचा जागीच मृत्यू झाला, तर मोटारमधील चारजण जखमी झाले असून, यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक आहे.

अपघाताची माहिती मिळताच लोणावळा शहर पोलीस निरीक्षक सचिन पाटील, पोलीस उपनिरीक्षक चमन शेख यांनी घटनास्थळी धाव घेतली. रस्ते विकास महामंडळाच्या यंत्रणेच्या मदतीने जखमींना बाहेर काढून उपचारासाठी नजिकच्या रुग्णालयात हलविले. त्यानंतर क्रेनच्या सहाय्याने दोन्ही अपघातग्रस्त वाहने बाजूला करून विस्कळित झालेली वाहतूक सुरळीत चालू केली. या घटनेचा पुढील तपास लोणावळा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संदेश चंदनशिव हे करीत आहेत.

# चाकण एमआयडीसीतील उद्योजक त्रस्त; कोंडी फोडण्यासाठी विशेष नियोजन

## चाकण एमआयडीसी, पुणे-नाशिक आणि चाकण-तळेगाव महामार्गावरील भीषण वाहतूक कोंडीमुळे उद्योजक त्रस्त झाले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

म्हाळुंगे, चाकण एमआडीसी, पुणे-नाशिक, चाकण-तळेगाव व चाकण-शिक्रापूर महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. रस्त्यावर पडलेल्या खड्डयांमुळे कोंडीत मोठी भर पडत आहे. त्याचा उद्योगांना मोठा फटका बसत असून, येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी विशेष नियोजन करण्याची मागणी उद्योजकांनी पोलिसांकडे केली.

उद्योजकांच्या सुरक्षेसाठी, त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी आणि खंडणीखोरांना चाप लावण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून उद्योजकांबरोबर बैठक घेण्यात आली. पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता नीलेश मोडवे, सहायक कामगार आयुक्त मुकुंद होने, महावितरणचे केशव कालुमाळी, पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर, मारुती जगताप, विक्रांत देशमुख, सहायक आयुक्त प्रिया डमाळे, सुदर्शन राठोड, गुलाब इमानदार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, दिगंबर सूर्यवंशी, संजय सोळंके, जितेंद्र कदम यांच्यासह ६० उद्योजक प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते.

म्हाळुंगे, चाकण एमआयडीसी परिसरातील वाहतूक समस्या बिकट झाली आहे. पुणे-नाशिक, चाकण-तळेगाव व चाकण-शिक्रापूर महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होते. रस्त्यांवर खड्डे पडल्याने वाहतूक संथ झाली आहे. अवजड वाहनेही रस्त्यावर उभी केली जातात. त्यामुळे कोंडीत भर पडत आहे. ती सोडविण्यासाठी वाहतुकीचे विशेष नियोजन करण्याची मागणी उद्योजकांनी बैठकीत केली. कंपन्यातील कामगारांची सुरक्षा, उद्योजक, कामगारांमध्ये सुरक्षिततेचे वातावारण निर्माण करणे, कायदा व सुव्यस्थेबाबत चर्चा झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

उद्योजकांना कोणताही त्रास होणार याची दक्षता घेतली जात आहे. पोलीस उद्योजक, कामगारांच्या पाठीशी आहेत. औद्योगिक कक्षाकडे तक्रार येताच तत्काळ कारवाई केली जाते. उद्योजकांनी पुढे येऊन तक्रार करावी. ७५१७७५१७९३, ९०२९६३३४५२ किंवा INDGREVCELL-PCPC@MAH.GOVI.IN या इ-मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी केले आहे.



### औद्योगिक तक्रार निवारण कक्षाकडे तक्रारीचे आवाहन

» पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तलयाअंतर्गत सुमारे ४० ते ४५ लाख इतकी लोकसंख्या येते. आळंदी- मरकळ, भोसरी, म्हाळुंगे, चाकण, हिंजवडी, तळेगाव दाभाडे ही औद्योगिक क्षेत्र आयुक्तालयाच्या अखत्यारीत येतात. या ठिकाणी सुमारे दोन हजार लहान आणि तीनशे ते चारशे मोठ्या कंपन्या आहेत. उद्योगांना भयमुक्त वातावरण मिळावे, गुन्ह्यांच्या निराकरणासाठी औद्योगिक तक्रार निवारण कक्षाची स्थापना केली आहे. कोणीही त्रास देत असेल, तर उद्योजकांनी या कक्षाकडे तक्रार करण्याचे आवाहन पोलिसांनी केले.

### रस्त्यावर वाहने उभी केल्याने कोंडीत भर

» एमआयडीसीने वाहनतळाची व्यवस्था करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. जागा उपलब्ध झाल्यास अवजड वाहनांचा पार्किंगचा प्रश्न सुटेल. त्यामुळे रस्त्यावर कोंडी होणार नाही. रस्त्यावर खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनांचा वेग कमी होत असून, कोंडीत भर पडत आहे. खड्डे बुजविल्यानंतर कोंडी कमी होईल. रस्त्यावर अवजड वाहने उभी करणाऱ्यांवर कारवाई केली जाते, असे वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी सांगितले.

# रिंगरोड, पूररेषा अन् गावहद्दीची माहिती एका क्लिकवर

## 'पीएमआरडीए'चे 'जीआयएस' पोर्टल सज्ज, नागरिकांचे कार्यालयातील हेलपाटे थांबणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) नागरिक, गुंतवणूकदार, विकासक, वास्तुविशारद, अभियंते आणि विविध शासकीय विभागांना नियोजनविषयक माहिती सुलभ, पारदर्शक व डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी 'जीआयएस' (जिओग्राफिक इन्फॉर्मेशन सिस्टिम) आधारित सार्वजनिक पोर्टल विकसित केले आहे. या डिजिटल सुविधेमुळे नागरिकांना प्रादेशिक नियोजनाची सर्व प्राथमिक माहिती एकाच ठिकाणी आणि घरबसल्या उपलब्ध होणार आहे.

या सार्वजनिक 'जीआयएस' पोर्टलवर 'पीएमआरडीए' कार्यक्षेत्राची सीमा, मंजूर प्रादेशिक योजना (आरपी), प्रस्तावित नगररचना योजना (टीपी स्कीम), गावहद्द तसेच महापालिका व नगर परिषदांच्या सीमांची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यासोबतच एमएसआरडीसी व पीएमआरडीए रिंगरोड, पुणे मेट्रो मार्ग, रेल्वे मार्ग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे वर्गीकृत रस्ते आणि मेट्रो स्थानकांभोवतीचे टीओडी (ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट) झोन या पायाभूत सुविधांच्या लेअर्सचाही समावेश आहे.

पर्यावरण व सुरक्षेच्या दृष्टीने पाटबंधारे विभागाच्या पूर लाल व निळ्या रेषा, वन्यजीव अभयारण्य, हिल स्टेशन व टाउनशिपच्या सीमा तसेच एनडीए, एचईएमआरएल, एमएडीसी (पुरंदर विमानतळ) आणि इतर संरक्षण विभागांचे बफर झोन यांची माहितीही या पोर्टलवर टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या पोर्टलमुळे भूखंड किंवा मालमत्तेच्या परिसरातील नियोजनाची माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना 'पीएमआरडीए' कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची आवश्यकता नाही. विकासक, वास्तुविशारद व अभियंत्यांना विकास प्रस्ताव तयार करताना आवश्यक असणारी अधिकृत प्राथमिक माहिती सहज उपलब्ध होणार आहे.

या डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे नियोजन प्रक्रियेतील पारदर्शकता वाढून विविध शासकीय विभागांमधील माहितीचा समन्वय सुधारण्यास मदत होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 'डिजिटल गव्हर्नन्स'ला चालना देणे आणि शाश्वत विकासासाठी माहिती आधारित निर्णय घेणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.




> पीएमआरडीए'च्या कार्यक्षेत्रातील नियोजन आणि विकासप्रक्रिया अधिक पारदर्शक, गतिमान व नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने हे जीआयएस आधारित सार्वजनिक पोर्टल महत्त्वाचे पाऊल आहे. नागरिकांना आता त्यांच्या भूखंडाच्या परिसरातील रस्ते, पूररेषा, मेट्रो मार्ग आणि प्रादेशिक नियोजनाची अधिकृत प्राथमिक माहिती घरबसल्या एका क्लिकवर मिळणार आहे.
>
> - डॉ. अभिजित चौधरी, आयुक्त, पीएमआरडीए.

# पुणे शहरातील खड्ड्यांबाबत महापौर नागपुरे यांचं मोठं वक्तव्य !

## शहरात यंदा खड्ड्यांची संख्या कमी आहे, असा दावा महापौर मंजूषा नागपुरे यांनी केला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील विविध रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांमुळे त्यामधून वाहने चालवताना नागरिकांचे कंबरडे मोडत आहे. रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डयांचा सामना नागरिक एकीकडे करीत असताना 'शहरात यंदा खड्डयांची संख्या कमी आहे,' असा दावा महापौर मंजूषा नागपुरे यांनी केला.

नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावरील (सिंहगड रस्ता) वाहतूक कोंडीवरून पोलिसांना अहवाल देण्याचे आदेश देऊन सजगता दाखविणाऱ्या महापौरांनी दुसऱ्याच दिवशी शहरातील खड्डयांच्या समस्येवर केलेल्या या वक्तव्यामुळे आश्चर्य व्यक्त व्यक्त केले जात आहे

पुणे शहरातील अनेक महत्त्वाच्या रस्त्यांवर खड्डयांची चाळण झाली आहे. मनुष्यबळाअभावी प्रशासन हतबल असल्याची प्रतिक्रिया महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. तसेच, महापालिकेचा पथ विभागातील कारभार याला जबाबदार असल्याचेही ते म्हणाले होते. तसेच, त्यांनी कडक शब्दांत प्रशासनातील अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली होती.

रस्त्यांवर पडलेले खड्डे दुरुस्त करण्यासाठी पथ विभागाने जोर लावला असून अधिक गतीने काम करून रस्तेदुरुस्ती केली जात आहे. रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू असल्याचे पथ विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. रस्त्यावर पडलेले खड्डे बुजवण्यासाठी पथ विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे.

एकीकडे हे चित्र असताना शहरात गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा खड्डयांची संख्या कमी असल्याचे महापौर मंजूषा नागपुरे यांनी म्हटले आहे. महापौर नागपुरे यांच्या वक्तव्यावर आश्चर्य व्यक्त केले जात आहे. शहरात जागोजागी खड्डयांचे साम्राज्य पसरलेले असताना शहराच्या प्रथम नागरिक असलेल्या महापौर मंजुषा नागपुरे यांना खड्डे दिसत नसतील आणि रस्त्यावर खड्डे कमीच असल्याचा दावा त्या करत असतील तर महापौर नक्की कोणत्या रस्त्यावरून प्रवास करतात, अशी विचारणा महापालिकेचे विरोधी पक्षनेते निलेश निकम यांनी केली आहे.

शहरातील खड्डयांबाबत महापौर नागपुरे यांनी केलेल्या डाव्यावर महापालिकेतील काँग्रेसचे गटनेते रामचंद्र उर्फ चंदू कदम यांनीही टीका केली आहे. ते म्हणाले, शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांमुळे पुणेकर त्रस्त झाले आहेत. खड्डयांमुळे वाहतूक कोंडी होते. त्यामध्ये वाहनचालक तासन्तास अडकून पडतात. रस्त्यांवर पडलेले खड्डे दुरुस्तीसाठी प्रशासनावर वचक ठेवायचा सोडून यंदा खड्डे कमी, असे वक्तव्य करणे म्हणजे पुणेकरांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. खड्डयांच्या प्रश्नावरील जबाबदारी झटकण्याचा महापौर प्रयत्न करीत आहेत.



### विरोधकांचा हल्लाबोल

» महापौरांच्या वक्तव्यावर विरोधी पक्षनेते निलेश निकम आणि काँग्रेसचे गटनेते रामचंद्र (चंदू) कदम यांनी तीव्र टीका केली. शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे असून नागरिकांना दररोज त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी म्हटले. खड्डयांमुळे वाहतूक कोंडी वाढत असून अपघातांचाही धोका निर्माण होत आहे. प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याऐवजी खड्डे कमी असल्याचा दावा करणे म्हणजे पुणेकरांच्या समस्यांकडे दुर्लक्ष असल्याचा आरोप विरोधकांनी केला.

### महापौरांचा दावा चर्चेत

» महापौर मंजूषा नागपुरे यांनी शहरात गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा रस्त्यांवरील खड्डयांची संख्या कमी असल्याचा दावा केला. पथ विभागाकडून खड्डे बुजविण्याची विशेष मोहीम सुरू असून, दुरुस्तीची कामे वेगाने होत असल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र, शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर अजूनही मोठ्या प्रमाणावर खड्डे असल्याने त्यांच्या या वक्तव्यावर नागरिकांसह विरोधी पक्षांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. पावसाळ्यात सुरक्षित व सुरळीत वाहतुकीसाठी रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी विविध स्तरांतून होत आहे.

### पथ विभागासमोर मोठे आव्हान

» महापालिका प्रशासनाने शहरातील खड्डे बुजविण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली असून पथ विभागाकडून युद्धपातळीवर दुरुस्ती सुरू आहे. मात्र, सततचा पाऊस, मनुष्यबळाची कमतरता आणि खराब झालेल्या रस्त्यांमुळे कामांमध्ये अडचणी येत आहेत. महापालिका आयुक्तांनीही पथ विभागाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त करत अधिकाऱ्यांना जबाबदारीने काम करण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांना सुरक्षित आणि खड्डेमुक्त रस्ते उपलब्ध करून देणे हे प्रशासनापुढील प्रमुख आव्हान बनले आहे.

# ढोल-ताशा पथकांचा सराव अन् महापालिकेचे पाऊल !

## गणेशोत्सवासाठी नदीपात्रासह, महापालिकेच्या मोकळ्या जागांवर आणि शाळांच्या मैदानांवर ढोल-ताशा पथकांनी सराव करण्यास सुरुवात केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी नदीपात्रासह, महापालिकेच्या मोकळ्या जागांवर आणि शाळांच्या मैदानांवर ढोल-ताशा पथकांनी सराव करण्यास सुरुवात केली आहे. या बाबत काही तक्रारी महापालिकेकडे आल्या आहेत. त्यामुळे या पथकांना जागा देण्याबाबतची नियमावली तयार करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

पुणे शहरातील गणेशोत्सवाला मोठी परंपरा आहे. ढोल-ताशांसह लेझीम, टिपरी, झांजा, शंखनाद अशा विविध पथकांचे सादरीकरण होते. यासाठी ही पथके गणेशोत्सवापूर्वी शहरातील विविध भागांत सराव करतात. यामध्ये प्रामुख्याने नदीपात्रातील जागा, महापालिकेच्या मालकीची मोकळी मैदाने यावर हा सराव चालतो. अनेकदा रस्त्याच्या कडेलादेखील काही पथके सराव करतात.

निवासी भागाजवळ वादनाचा सराव झाल्यास त्याचा त्रास नागरिकांना आणि स्थानिक रहिवाशांना होतो. ढोल-ताशा वादक पथकांनी काय काळजी घ्यावी, कोणाची परवानगी घ्यावी, कोणत्या वेळेत सराव करावा, किती वेळ सराव करावा, या बाबत नियमावली तयार करण्याचे काम महापालिका प्रशासनाने सुरू केले आहे. यासाठी महापालिकेच्या मालमत्ता व्यवस्थापन, शिक्षण आणि क्रीडा विभागाच्या उपायुक्तांकडून अहवाल मागविण्यात आला आहे

या माहितीवरून महापालिका प्रशासन नियमावली तयार करणार असून, त्या नियमांचे पालन करण्याचे बंधन ढोल-ताशा पथकांवर असणार आहे. या पथकांना महापालिकेने घालून दिलेली नियमावली नुसार सराव करावा लागणार आहे. काही दिवसांपूर्वी ढोल ताशा पथकांनी नदीपात्रात सराव करण्यास सुरुवात केली होती. त्यासाठी महापालिकेच्या कोणत्याही विभागाची परवानगी घेण्यात आलेली नव्हती.



### ढोल-ताशा सरावासाठी नियमावली

» गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ढोल-ताशा पथकांच्या सरावासाठी महापालिका स्वतंत्र नियमावली तयार करणार आहे. सरावासाठी कोणत्या जागा वापरता येतील, कोणाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल, सरावाची वेळ आणि कालावधी काय असेल, याबाबत स्पष्ट नियम ठरवले जाणार आहेत. नियमांचे पालन करणे सर्व पथकांसाठी बंधनकारक असेल. यासाठी महापालिकेच्या मालमत्ता व्यवस्थापन, शिक्षण आणि क्रीडा विभागांकडून माहिती मागविण्यात आली असून, त्यानुसार अंतिम मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली जाणार आहेत.

# सावधान! बाजारात केवळ 30 टक्केच शुद्ध पनीर तर उर्वरित 70 टक्के ॲनालॉग पनीर

## पनीरच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या ॲनालॉग अथवा दुग्धेतर पनीरच्या उत्पादनासह विक्रीवर एक वर्षासाठी बंदीचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पनीरच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या ॲनालॉग अथवा दुग्धेतर पनीरच्या उत्पादनासह विक्रीवर एक वर्षासाठी बंदीचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या बंदीचे दुग्ध उद्योगातून स्वागत करण्यात आले आहे. ग्राहकांची फसवणूक टाळण्यासोबत दुग्ध उद्योगासाठी फायद्याचा हा निर्णय असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. दरम्यान, बाजारात विक्री होणाऱ्या पनीरमध्ये ॲनालॉग पनीरचा वाटा सुमारे ७० टक्के असावा, असा अंदाज उद्योगातून व्यक्त करण्यात आला आहे.

सरकारने ॲनालॉग पनीरचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर एक वर्षासाठी बंदी घातली आहे. राज्यभरातील तपासणीत पनीरचे ३५.४ टक्के नमुने विहित मानकांशी विसंगत आढळले होते. तसेच, अनेक नमुन्यांमध्ये दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पतीजन्य स्निग्धांशाचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले. यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या हितातून सरकारने हा बंदीचा निर्णय घेतला आहे. ॲनालॉग पनीर हे स्वस्त असल्याने हॉटेलमध्ये त्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असल्यावरही बोट ठेवण्यात आले होते.

या निर्णयाचे राज्यातील दुग्ध उद्योगाने स्वागत केले आहे.'पनीर आणि ॲनालॉग पनीर यातील फरक सर्वसामान्य ग्राहकांना ओळखता येत नाही. एवढेच काय हॉटेलचालकां नाही यातील फरक कळत नाही. त्यामुळे पनीरच्या नावाखाली सुरू असलेल्या ॲनालॉग पनीरवर बंदी आणण्याची मागणी दुग्ध उद्योगाकडून करण्यात आली होती. त्यावर अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी हॉटेलचालकांनी मेन्यूमध्ये पनीर आणि ॲनालॉग पनीर, असा उल्लेख स्पष्टपणे करावे, असे निर्देश दिले होते. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत फारसा फरक पडला नव्हता. त्यामुळे अखेर हे बंदीचे पाऊल उचलण्यात आले,' अशी माहिती दुग्ध उद्योगातील प्रतिनिधींनी दिली.



### ग्राहकांच्या हिताचा निर्णय

» पनीरच्या नावाखाली ॲनालॉग पनीरची विक्री ही ग्राहकाची शुद्ध फसवणूक होती. सरकारने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. दुग्ध उद्योगाकडून याबाबत मागणी केली जात होती. ॲनालॉग पनीर प्रमाणित नसल्याने त्यात वापरण्यात येणारी रसायने आणि इतर घटकांबाबतही साशंकता होती. या निर्णयामुळे दुग्ध उद्योगाला फायदा होणार असली तरी व्यापक जनहिताच्या दृष्टिकोनातून हा निर्णय महत्वाचा आहे, अशी प्रतिक्रिया चितळे डेअरीचे भागीदार गिरीश चितळे यांनी दिली.

### तुटवडा होणार नाही

» हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो दोन टप्प्यात सुरू होणार आहे. पहिला टप्पा मान ते बालेवाडी आणि दुसरा टप्पा बाणेर हायस्ट्रीट ते शिवाजीनगर असा असेल. माण ते बालेवाडी १२ स्थानकांदरम्यानच्या सेवेला मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी २३ जुलैला तात्पुरते प्राधिकरण प्रदान केले आहे. या मंजुरीमुळे सीबीटीसी सिग्नलिंग प्रणालीअंतर्गत एटीपी मोडवर मेट्रो ताशी ८० किलोमीटर या कमाल वेगाने धावू शकणार आहे. सर्व वैधानिक तपासण्या, चाचण्या आणि सुरक्षा मानकांची पूर्तता झाल्यानंतरच ही मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे १३ किलोमीटर लांबीचा हा दुहेरी मार्ग ७५० व्होल्ट डीसी थर्ड रेल ट्रॅक्शन प्रणालीवर कार्यरत राहणार आहे.

### हॉटेलांमध्ये जास्त वापर

» पनीरमध्ये दुधातील स्निग्धांश तर ॲनालॉग पनीरमध्ये वनस्पतीजन्य स्निग्धांश वापरला जातो. ॲनालॉग पनीरच्या उत्पादनासाठी सरकारकडून अधिकृत परवाना दिला जात होता. मात्र, हा पनीरला स्वस्त पर्याय असल्याने हॉटेलचालकांकडून त्याचा जास्त वापर केला जात होता. याचबरोबर पनीरच्या नावाखाली ॲनालॉग पनीरची विक्री करून ग्राहकांची फसवणूक केली जात होती. त्यामुळे त्यावर बंदीचा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त दि.वा. भोगावडे यांनी दिली.

# खडकवासलातून सध्या मुठा नदीत 8,777 क्युसेकने विसर्ग

## महिनाभरात धरणसाखळीत 43 टीएमसी पाणी जमा, सततच्या पावसामुळे 17 टीएमसी सोडले

**पुणे | प्रतिनिधी**

पानशेत, मोसे-मुठा खोऱ्यातील संततधार पावसामुळे खडकवासला धरणसाखळीत अवघ्या महिनाभरात क्षमतेच्या दीडपट म्हणजे जवळपास ४३ टीएमसी पाणी जमा झाले. त्यातील १७ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला.


साखळीची एकूण क्षमता २९.१५ टीएमसी आहे. गुरुवारीसायंकाळी पाच वाजता खडकवासला धरणातून मुठा नदीत ८ हजार ७७७ क्युसेकने पाणी सोडले जात होते.

जून महिना कोरडा गेल्याने धरणसाखळीत अल्प पाणी होते. ४ जुलै रोजी धरणसाखळीत ४.६८ टीएमसी पाणी होते. मात्र, जुलै महिन्यात धरणक्षेत्रात धो-धो पाऊस कोसळला. खडकवासला धरणाचे शाखा अभियंता विरेश राऊत म्हणाले की, महिनाभरात धरणसाखळीत ४३ टीएमसीपेक्षा अधिक पाण्याची आवक झाली.

त्यातील १२.३३ टीएमसी पाणी खडकवासलातून मुठा नदीत सोडले. शहर व जिल्ह्यातील नागरिकांना पाण्यासाठी मुठा कालव्यातून अडीच टीएमसी व बंदिस्त जलवाहिन्यांतून दीड टीएमसी पाणी सोडण्यात आले.

अल निनोमुळे यंदा पावसाचे कमी होण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता. त्यामुळे खडकवासला धरणसाखळीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. जुलैपासून घाटमाथ्यावर पाऊस सक्रिय झाला.

त्यामुळे सध्या पानशेतमधून ३ हजार ७९६, वरसगावमधून ३ हजार ५७७ व टेमघरमधून १ हजार १६० क्युसेक पाणी सोडले जात आहे. गुरुवारी दिवसभरात टेमघर येथे १४, वरसगाव येथे १३, पानशेत येथे १४ आणि खडकवासला येथे ४ मिमी पाऊस पडला.



### जुलैच्या पावसाने बदलले चित्र

» 'जून महिन्यात पाऊस कमी झाल्याने ४ जुलै रोजी धरणसाखळीत केवळ ४.६८ टीएमसी पाणीसाठा शिल्लक होता. अल निनोच्या पार्श्वभूमीवर पाण्याची चिंता निर्माण झाली होती. मात्र जुलैमध्ये मोसे-मुठा खोऱ्यात आणि घाटमाथ्यावर झालेल्या संततधार पावसामुळे परिस्थिती पूर्णपणे बदलली. धरणसाखळी वेगाने भरली आणि पुणे शहराच्या पाणीपुरवठ्याबाबतची चिंता दूर झाली. सध्या धरणांतील पाणीसाठा समाधानकारक असून, भविष्यातील गरजांसाठीही पुरेसा साठा उपलब्ध झाला आहे.